# संकल्पपूर्ती

२०१४ ते २०१७



## महापौर सौ. राखी संजय कंचर्लावार

यांचे कार्यकर्तृत्व

चंद्रपूर शहर महानगर पालिका, चंद्रपूर

# आराध्य दैवत माता महाकाली



नमस्ते सते ते जगत्कारणाय
नमस्ते चिते सर्वलोकाश्रयाय।
त्वमेकं शरण्यं त्वमेकं वरेण्यं
त्वमेकं जगत्कतृ प्राहर्तु ।।

# आमचे मार्गदर्शक



**मा. श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार**

आमदार, बल्लारपूर-मूल विधानसभा क्षेत्र
माजी वित्त व नियोजन, वन मंत्री
अध्यक्ष, लोकलेखा समिती, विधिमंडळ



**मा. श्री. हंसराज अहीर**

माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री
माजी खासदार, चंद्रपूर-वणी लोकसभा क्षेत्र

# शतशः आभार!




चंद्रपूरची लोकसंख्या तीन लाखांच्यावर गेल्याने २५ ऑक्टोबर २०११ मध्ये नगरपालिका बरखास्त करून महानगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी २०१२ मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. भानापेठ प्रभागात महिला आरक्षण होते. राखी संजय कंचर्लावार  यांनी उमेदवारी दाखल केली आणि पहिल्याच प्रयत्नात निवडून आल्या. राजकारणात येण्याची ही पहिलीच वेळ. राखीताईंनी नगरसेवक म्हणून उत्तमरीत्या काम केले. आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. अडीच वर्षांनी पहिल्या महापौरांचा कार्यकाळ संपला आणि पुढील अडीच वर्षासाठी निवडणूक झाली. ३०/१०/२०१४ रोजी महापौरपदाची निवड झाली. त्यात राखी संजय कंचर्लावार विजयी झाल्या. चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीतील महापौर कक्षात विराजमान होणाऱ्या त्या पहिल्या महापौर. खुर्चीवर बसल्यावर अनेक आव्हाने होती. ती पेलण्याची ताकद आणि शक्ती जनतेच्या शुभेच्छा आणि प्रेमातून मिळाली. पुढील अडीच वर्षे कोणती कामे करायची, याची यादीच त्यांनी तयार केली. ही यादी नुसती तयारच केली नाही तर प्रत्यक्ष कृतीत आणि कार्यातून सत्यात उतरविली. त्या अर्थशास्त्रात एम. ए. असून, रांगोळी, संगीत, गायन आणि पेंटिंगमध्ये आवड आहे. पती श्री. संजय नारायण कंचर्लावार हे तत्कालीन नगरपरिषदेचे दोनवेळा उपनगराध्यक्ष होते. २० वर्षांपासून ते नगरसेवक म्हणून कार्यरत आहेत. २०१४ ते २०१७ या कार्यकाळात केलेल्या कार्याचा घेतलेला हा आढावा.



संकल्पपूर्ती

## शुभेच्छा संदेश



# राखीताईंचे विकासाभिमुख कार्य अभिनंदनीय

मागील अडीच वर्षात चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर सौ. राखीताई कंचर्लावार यांनी केलेली उल्लेखनिय कामगिरी व विकासकामे या माध्यमातून भारतीय जनता पार्टीची प्रतिमा जनमानसात अधिक ओजस्वी झाली आहे. महापौर म्हणून त्यांनी मोठ्या प्रमाणावर विकासकामे शहरात केली. मी स्वत: राज्याचा वित्तमंत्री व चंद्रपूर जिल्ह्याचा पालकमंत्री असताना शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करविला. त्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणावर विकासकामे शहरात झाली आहेत. शहरात त्यांच्या संकल्पनेतून गणेश विसर्जनाच्या निमित्ताने प्रथमच निर्माल्य कलश व कृत्रिम तलाव निर्मिती करून चंद्रपूर महानगरातील गणेशभक्तांना गणेश विसर्जनासाठी प्रेरित करण्यात आले. तसेच घंटागाडीद्वारे घरोघरी कचरा संकलनाचे काम करण्यात आले. घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली. स्वच्छ महाराष्ट्र अभियानाअंतर्गत विदर्भात चंद्रपूर मनपा प्रथम क्रमांकावर राहिली, हे श्रेय राखीताईंचेच आहे. चंद्रपूर हागणदारी मुक्तीचा संकल्प पूर्ण करण्यात आला, ही बाब सुध्दा अभिमानास्पद आहे. वनविभागातर्फे १ जुलै २०१६ रोजी राज्यात विक्रमी वृक्ष लागवड करण्यात आली. या महामोहीमेत राखीताईंच्या नेतृत्वात चंद्रपूर शहराने सुध्दा उल्लेखनीय योगदान दिले. सुमारे २५ लक्षापेक्षा जास्त वृक्ष लागवड शहरात करण्यात आली आहे. विविध सोयी सुविधा जनतेला उपलब्ध करत महानगरपालिकेचे प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याबाबत राखीताईंनी घेतलेला पुढाकार निश्चित अभिनंदनीय आहे. या पुढील काळातही भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वात विकासाची प्रक्रिया अशीच पुढे जाणार आहे. सौ. राखीताईंना भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे, अशी विनंती मी आपणास करित आहे. या शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता कधीही भासू देणार नाही, अशी ग्वाही मी आपणास देत आहे. धन्यवाद !



**आपला स्नेहांकित**

**आमदार सुधीर मुनगंटीवार**
**अध्यक्ष, लोकलेखा समिती, महाराष्ट्र विधीमंडळ**



## शुभेच्छा संदेश

# राखीताईंनी निर्माण केला नवा प्रशासकीय आदर्श



महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर भाजपाला दुसऱ्या सत्रात सौ. राखीताई संजय कंचर्लावार यांच्या रूपाने महापौरपदाची संधी प्राप्त झाली. भाजपाने नेहमी विकासाच्या राजकारणाला प्राधान्य दिले, त्याचा हा प्रभाव आहे. मागील अडीच वर्षात सौ. राखीताई यांनी केलेल्या कार्याचा आढावा वाचतांना त्यांनी शहराच्या सर्व प्रभागात विकास कामांची केलेली विविध विकासकार्य दिसली. शहराचा सर्वकष विकास करण्यासाठी परिश्रम घेण्याची त्यांची तयारी व त्यासाठी कार्यरत असतांना केंद्राच्या विविध योजनांची शहरात अंमलबजावणी व्हावी म्हणून त्यांची तळमळ मला अनुभवता आली. भाजपच्या विकास राजकारणाला प्रत्यक्ष मूर्त रूप देण्यासाठी त्यांनी शहरात केलेली कामे त्यांच्या सक्रियतेचा परिणाम आहे. त्यांच्या कार्याचा झंझावात पाहताना त्या शहराला विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी यशस्वी झाल्या आहेत, असेच म्हणावे लागेल. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता अधिकाऱ्यांना कामाला लावण्याचा आलेला अनुभव त्यांच्यातील एक चांगला प्रशासक दिसतो. प्रशासनाचा पूर्वी अनुभव नसताना त्यांनी त्यांच्या कार्यकाळात एक नवा प्रशासकीय आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या कार्याबद्दल त्यांनी शहराला विकासाच्या वाटेवर नेण्यात मोलाची भूमिका पार पाडल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो! महानगरात विकासकामे करण्यासाठी अधिकारी, नगरसेवक आणि सर्व सहकाऱ्यांशी समन्वय साधून नियोजित कार्य प्रत्यक्ष साकार करण्याची धडपड यामुळे त्या यशस्वी झाल्या आहेत. त्यांच्या बहुआयामी कार्यामुळे महानगरात भाजपच्या विकास धोरणावर जनतेचा अधिक विश्वास वाढला. भाजपा आणि आम्ही सर्व लोकप्रतिनिधी त्यांच्या सारख्या विकासाचे धोरण राबविणाऱ्या महापौर म्हणून त्यांना अपेक्षित सहकार्य केले. त्यांच्या या यशस्वी कारकीर्दीचे जनतेकडून मुल्यांकन करून घेण्यासाठी भाजपाच्या परंपरेनुसार त्यांच्या कार्याचा अहवाल, कार्यवृत्तांत प्रकाशित होत आहे. माझ्या या प्रकाशनाला हार्दिक शुभेच्छा देऊन भविष्यातही त्या भाजपच्या वाटचालीत सोबत राहून विकासाचे पर्व असेच पुढे नेण्यात सहकार्य करतील, असा विश्वास व्यक्त करतो. धन्यवाद !



**हंसराज गं. अहीर**

माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री (भारत सरकार)





# मनोगत



चंद्रपूर शहर हे पूर्वीचे चांदा. 'लोकापूर' असे होते जे प्रथम 'इंदपूर' आणि त्यानंतर १९६४ च्या सुमारास पुन्हा त्याचे मूळ नाव 'चंद्रपूर' करण्यात आले. चंद्रपूर ही गोंड राजांची राजधानी होती व नंतर १७ व्या शतकात नागपूरच्या भोसले मराठ्यांनी चंद्रपूर ताब्यात घेतले. ब्रिटिश काळात १८५४ मध्ये, चंद्रपूर स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांपैकी चंद्रपूर हे जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण. इरई व झरपट नद्यांच्या संगमाजवळ वसलेले शहर आहे. चंद्रपूर परिसरात कोळसा, लोखंड, बेरियम सल्फेट, चिनीमाती इ. खनिजे मिळतात. जंगलाचे प्रमाणही मोठे असल्याने त्यावर अवलंबून असणाऱ्या उद्योगांना चंद्रपूर हेच मध्यवर्ती ठिकाण आहे. ताडोबा राष्ट्रीय उद्यान चंद्रपूरपासून ४५ किमी. उत्तरेस आहे. चंद्रपूर येथे किल्ला, तट तसेच अंचलेश्वर, महाकाली, मुरलीधर, रेणुका इत्यादी मंदिरे येथे आहेत.

प्रशासन आणि जनसेवेसाठी ब्रिटिश काळापासून येथे नगरपरिषद होती. औद्योगिकीकरण वाढल्याने कामगार, विद्यार्थी, नोकरदार वर्ग शहरात वाढला आणि चंद्रपूरची लोकसंख्या तीन लाखांच्यावर पोहोचली. २५ ऑक्टोबर २०११ मध्ये नगरपालिका बरखास्त करून महानगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी २०१२ मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. भानापेठ प्रभागात महिला आरक्षण होते. माझे पती श्री. संजय कंचर्लावार यांनी उमेदवारी दाखल करण्यास मला प्रोत्साहित केले. त्यांना राजकारण आणि निवडणुकीचा दीर्घ अनुभव. त्यांच्याच मार्गदर्शनात आणि सहकार्याने पहिल्याच प्रयत्नात मी निवडून आली. राजकारणात येण्याची ही पहिलीच वेळ. नगरसेवक म्हणून उत्तमरीत्या काम केले. आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. अडीच वर्षांनी पहिल्या महापौरांचा कार्यकाळ संपला आणि पुढील अडीच वर्षासाठी निवडणूक झाली. ३०/१०/२०१४ रोजी महापौरपदाची निवड झाली. त्यात मी सर्वांच्या सहकार्याने विजयी झाली. चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीतील महापौर कक्षात विराजमान होणारी पहिली महापौर. खुर्चीवर बसल्यावर अनेक आव्हाने होती. ती पेलण्याची ताकद आणि शक्ती जनतेच्या शुभेच्छा आणि प्रेमातून मिळाली. पुढील अडीच वर्षे कोणती कामे करायची, याची ब्ल्यू प्रिंट तयार केली आणि पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

केंद्रात मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकासाला प्राधान्य देणारे सरकार स्थापन झाले. देशात मोदी सरकार येण्यापूर्वी विकासाबद्दल कटिबद्धता दर्शवून "सबका साथ , सबका विकास" असे म्हणणारे आणि त्याप्रमाणे कृती करणारे सरकार दिसत नव्हते. देशाला जागतिक महासत्ता बनविण्याचे स्वप्न घेऊन त्या दिशेने प्रखर वाटचाल करणाऱ्या मा. नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेचे समर्थन म्हणून चंद्रपूर महानगरालासुध्दा विकासाच्या वाटेवर नेण्याचा संकल्प केला. भाजपाच्या सहकार्याने मला महापौरपदाची संधी प्राप्त झाली. महाराष्ट्रात मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपचे सरकार आल्याने यापूर्वी शहराच्या विकासासाठी भरघोस निधी मिळाला. केंद्राच्या विविध योजना आणि राज्य सरकारच्या माध्यमातून भरीव निधी उपलब्ध होऊ लागला. चंद्रपूर शहराचा चेहरामोहरा बदलविण्यात चंद्रपूर शहर महानगरपालिकेचा मोठा वाटा आहे. राज्याचे तत्कालीन अर्थ व नियोजन तथा वनमंत्री मा. श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार आणि तत्कालीन केंद्रीय गृहराज्यमंत्री  मा. श्री. हंसराज





भैय्या अहिर यांची दूरदृष्टी आणि मार्गदर्शन यामुळे महत्वाचे निर्णय घेता आले. म्हणूनच शहर विकासासाठी मोठा निधी मिळू शकला. वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शहरातील विकासकामांसाठी निधी मंजूर केल्याबद्दल चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे 'पुस्तकतुला' करत सत्कार करण्यात आला. शहराचे लोकप्रिय आमदार नानाभाऊ शामकुळे यांनीसुध्दा महानगराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन दिला. शासन स्तरावर विविध विभागाशी सुसंवाद स्थापन करुन अडचणीचे निराकरण करण्यात महत्वाची भुमिका पार पाडली. या सर्व महानुभावांनी माझ्या कार्यकाळात जे पाठबळ उपलब्ध करुन दिले, त्यामुळेच मला महापौर पदाची कारकीर्द यशस्वीरित्या पार पाडता आली. याबद्दल मी त्यांची कायम ऋणी राहील. महापौर म्हणून कार्यरत असतांना आपले शहर हे देशातील अभिनव आणि विकसीत शहर व्हावे, याकरिता सतत प्रयत्नशील राहिले आणि पुढेही राहणार.

घरोघरी शौचालय हा उपक्रम यशस्वीपणे राबविला. स्वच्छतेच्या या कार्यासाठी चंद्रपूर शहराला विदर्भातून पहिला क्रमांक प्राप्त झाला. २०२० मध्ये महाराष्ट्रातून चंद्रपूर शहर पहिल्या क्रमांकावर आले. माजी मंत्री सुधिरभाऊ मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ शहराचा हा वसा हाती घेतला. चंद्रपूर स्वच्छ शहर आणि पर्यावरणीय शहर निर्माण करण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या सर्व पदाधिकारी, नगरसेवक आणि अधिकारीवर्ग यांच्यामुळे हे सहज शक्य झाले. २०१४ ते २०१७ या अडीच वर्षाच्या कार्यकाळात क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील तरुण-तरुणींना त्यांच्या कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी आणि प्रोत्साहित करण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेने महापौर चषक २०१६ चे आयोजन केले. महाआरोग्य शिबीर, जटपूरा गेट ते पाच देऊळ चौकापर्यंत रस्त्याचे काम करण्यात आले. शिवाय मनपातर्फे रामाळा तलावाचे सौंदर्यीकरण करून रस्ता, स्ट्रीट लाईट, तलावाला स्टीलचे ग्रील व सिंगापूर पॅटर्न स्टॅच्यू उभारले. मौलाना अब्दुल कलाम आझाद बगीचाचे सौंदर्यीकरण व्हावे, यासाठी पुढाकार घेतला.

प्रशासकीय दृष्टिकोनातून आवश्यक असे अनेक महत्त्वाचे आणि कठोर निर्णय घ्यावे लागले. काही वेळेस नागरिकांचा रोषही पत्करावा लागला. मात्र , तशा निर्णयाने शहराचे भले झाले, याचा आनंद अधिक आहे. महापौर पदाच्या अडीच वर्षाच्या कारकिर्दीत अनेक खाचखळगे अनुभवायला मिळाले. अनेक चांगले-वाईट अनुभव आले. कुणी सुखावले तर कुणी दुखावले. मात्र, महानगरपालिकेच्या भल्यासाठी आणि शहराच्या उत्कर्षासाठी जे केले ते प्रामाणिकपणे केले. पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी या सर्वांनी आजपर्यंत चांगली साथ दिली. सांगायला बरेच काही आहे. हा संपूर्ण लेखाजोखा आमच्या सहृदयांनी या पुस्तकाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला. महापौर म्हणून माझ्या आतापर्यंतच्या कार्यकाळातील कार्य या स्मरणिकेच्या माध्यमातून जनता जनार्दनापर्यंत पोहचविण्यासाठी ज्या चमूने आग्रह धरीत हे घडवून आणले, त्या संपूर्ण चमूचे मी अगदी मनापासून धन्यवाद मानते.

भारतीय जनता पक्षासारखा विकासशील राजकारण आणि समाजकारण करणारा पक्ष माझ्या पाठीशी सदैव होता. या विकासाची बांधिलकी मानून कार्यरत राहील्यामुळेच विकासकार्य मोठ्या प्रमाणात करता आले. हे मी नम्रपणे नमूद करते. भाजपच्या लोकप्रतिनिधींनी कोणत्याही पदावर असतांना केलेल्या कामाचा अहवाल कार्यवृतांत स्वरुपात जनतेसमोर उपलब्ध करुन देण्याच्या चांगल्या परंपरेनुसार मी माझ्या कार्यकाळात केलेल्या कामांचा अहवाल आपल्या समोर ठेवत आहे. जनतेच्या विविध विकास कामांचा केलेला संकल्प आणि त्या दिशेने केलेल्या वाटचालीमुळे आज "संकल्पपूर्ती" झाली.

चंद्रपूर महानगरपालिकेतील सर्व पदाधिकारी, विरोधी पक्षातील सहकारी, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी आणि या शहरातील नागरिकांचे मी मनापासून आभार मानते, जे माझ्या प्रत्येक कार्यात साथ देत आहेत. या शहराप्रति माझे जे स्वप्न आहे, त्या स्वप्नांना बळ देण्यासाठी यापुढेही आपली साथ अशीच लाभेल, या विश्वासासह मी माझ्या मनोगताला येथे पूर्णविराम देते.

**सौ. राखी संजय कंचर्लावार**
महापौर , चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर







तत्कालीन चंद्रपूर नगरपरिषदेची इमारत पाडून नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यात आली. बांधकाम पूर्ण होईपर्यंत सातमजली इमारतीतून प्रशासकीय कामकाज सुरु होते. २६ फेब्रुवारी २०१६ रोजी चंद्रपूर शहर महानगर पालिका, चंद्रपूरच्या नवीन प्रशासकीय इमारतीचा उदघाटन सोहळा तत्कालीन अर्थमंत्री, आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या हस्ते, तत्कालीन केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर, विधानपरिषद सदस्य प्रा. अनिल सोले, महापौर राखी संजय कंचर्लावार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.







# शहर स्वच्छतेला प्राधान्य

**महिला महापौर म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर पहिले कर्तव्य म्हणून चंद्रपूर शहर स्वच्छ करण्याचा विडा उचलला. चंद्रपूर शहरामध्ये ठिकठिकाणी एकूण ६०० ते ७०० कचराकुंड्या होत्या. डस्टबिन मुक्त चंद्रपूरचे स्वप्न त्यांनी बघितले. घरोघरी जाऊन कचरा संकलन करणे आणि शहर स्वच्छ करण्याचा त्यांनी ध्यास घेतला. प्रारंभी प्रचंड विरोध झाला. विरोधकांनी पुतळे तयार करून ते जाळले. परंतु, निंदकाच्या निंदेकडे लक्ष न देता त्यांनी आपले कार्य सातत्याने सुरूच ठेवले. 'घरोघरी शौचालय' हा उपक्रम यशस्वीपणे राबविला.**

१ स्वच्छतेच्या या कार्यासाठी चंद्रपूर शहराला विदर्भातून पहिले क्रमांक प्राप्त झाला. २०२० मध्ये चंद्रपूर शहर महाराष्ट्रातून पहिल्या क्रमांकावर आले. माजी मंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ शहराचा हा वसा हाती घेतला.

२ विविध क्षेत्रांत यशस्वी झालेल्या व्यक्तींना 'स्वच्छता दूत' म्हणून ब्रँडअंबेसेडर नियुक्त केले. त्यांच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्व जनतेला पटवून दिले. कचरा विलगीकरण, नागरिकांचा सहभाग आणि स्वच्छता विभागाची यंत्रणा यांच्यावर महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी स्वतः लक्ष ठेवले.

३ १२ जून २०१५ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनात नागपूर येथे स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छतेचा संकल्प केला.

४ सप्तपदीत समाविष्ट असणाऱ्या सहभागाचा ठाम निर्धार, व्यापक लोकसहभाग, शंभर टक्के शौचालयाचा वापर, कचऱ्याचे संकलन-वर्गीकरण-वाहतूक, कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया, सांडपाण्यावर प्रक्रिया आणि हरीत स्वच्छ निर्मिती या सात मुद्द्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वप्न बघितले.








# कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी डस्टबीन




दरदिवशी निघणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी चंद्रपूर शहर स्वच्छ अभियानांतर्गत महापौर राखी कंचर्लावार यांच्या संकल्पनेतून महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रत्येक कुटूंबास डस्टबीन वितरीत करण्यात आले.



## ८२,०२०

मालमत्ताधारकांना डस्टबीन वितरणाचे उद्दिष्ट होते. प्रत्येक मालमत्ता धारकास हिरवे व निळे असे दोन डस्टबीन देण्यात आले. एकात ओला तर दुसऱ्या डस्टबीनमध्ये सुका कचरा टाकला जात आहे. शहरात शौचालयाचा कार्यक्रमही मनपाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर राबविला गेला.



महानगरपालिकेच्या गांधी चौकाजवळील मैदानात लोकनेते आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या हस्ते डस्टबीन वाटप झाले. या डस्टबीनमधील कचरा महानगरपालिकेच्या वतीने जमा केला जात आहे.



## ६,६९२

इतके वैयक्तिक शौचालयाचे मनपाचे उद्दिष्ट होते.








# पर्यावरण रक्षणासाठी कृत्रिम तलाव

■ चंद्रपूर शहरात मोठ्या प्रमाणात सार्वजनिक तसेच घरोघरी बाप्पाची स्थापना होते. १० दिवसांनी मोठ्या भक्तीभावाने अनंत चतुर्दशीच्या दिवशी निरोप देण्यात येतो.



■ चंद्रपूर शहर महानगरपालिकेने रामाळा तलावातील मूर्तींचे लाकडे व इतर कचरा काढला. निसर्ग रक्षणासाठी पर्यावरणपूरक गणेशोत्सव संकल्पना पुढे आणली. गणेशभक्तांनीही त्यास प्रतिसाद दिला आहे. भविष्यातही नागरिकांनी आपल्या घरच्या मूर्ती तलाव, नदी येथे विसर्जित न करता कृत्रिम तलावात विसर्जित कराव्या, असे आवाहन महापौर राखी संजय कंचर्लावार करतात.

■ शहरात सुमारे १० हजाराच्या आसपास गणेशमूर्तींचे विसर्जन होते. त्यामुळे रामाळा तलाव, इरई नदी आणि अन्य जलस्त्रोत दूषित होऊ लागली होती. त्यावर आळा घालण्यासाठी विसर्जन करण्याकरिता कृत्रिम तलाव तयार केले. निर्माल्यासाठी निर्माल्य कलश लावण्यात आले.







# चंद्रपूर शहराला मिळणार
# अमृतमय जल

केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत चंद्रपूर शहराच्या पाणीपुरवठा योजनेस दिनांक ०९/ ०६ /२०१९ रोजी मान्यता दिली.



या योजनेत हेडवर्क्स, अशुद्ध जलवाहिनी, शुद्ध जलवाहिनी, जलशुद्धीकरण केंद्र सुधारणा, ८ इंच पाण्याच्या टाक्याचे बांधकाम, ५२७.४३ किमी पाईपलाईनच्या कामाचा समावेश आहे.


शहरातील तुकूम, शास्त्रीनगर, बंगाली कॅम्प, नेताजी नगर बाबुपेठ, बाबुपेठ हायवे, महाकाली, रेव्हेन्यू कॉलनी, वडगाव आदी ८ पाण्याच्या टाकीचे बांधकाम आता पूर्णत्वास जात आहे

या योजनेतील टाक्यांच्या माध्यमातून झोननिहाय एकूण १६ भागांमध्ये पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. १ एप्रिल २०१६ रोजी महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी या कामाची पहिली पाहणी केली होती.



# प्रकाशमय पथ

रात्रीच्या सुमारास चौका-चौकात अंधारामुळे होणारी गैरसोय दूर करण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून चंद्रपूर शहरात विविध ठिकाणी हायमास्ट लाइट (पथदिवे) लावण्यात आले.



# घाणीच्या दुर्गंधीत पसरला
# ज्ञानाचा सुगंध

**भानापेठ वार्डातील एका जागेत सार्वजनिक शौचालय होते. आता घरोघरी वैयक्तिक व्यवस्था झाल्याने सार्वजनिक शौचालय रिकामे पडले होते. अशातच चंद्रपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून अनेक विद्यार्थी शहरात शिकायला येतात. अनेकजण स्पर्धा परीक्षेची तयारी करतात. मात्र, खासगी अभ्यासिकेत पैसे भरण्याची ऐपत प्रत्येकात नसते. गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या अभ्यासिकेचा प्रस्ताव पुढे ठेवला. चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे भानापेठ वार्डात संत कोलबास्वामी अभ्यासिका साकारण्यात आली.**




१ एकेकाळी अस्वच्छतेमुळे घाणीचा दुर्गंध असलेल्या या जागेला ज्ञानाचा सुगंध देण्याचे काम महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी केले.

२ **२२ फेब्रु, २०१७ रोजी लोकार्पण सोहळ्यात वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शहरातील विकासकामांसाठी भरघोस निधी मंजूर केल्याबद्दल चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे त्यांची 'पुस्तकतुला' करत सत्कार करण्यात आला.**

३ **कार्यक्रमाला तत्कालीन आमदार नानाभाऊ शामकुळे उपस्थित होते. मनपाच्या प्रयत्नांनी शौचालयाची जागा अभ्यासिकेत बदललेल्या अश्या कोलबास्वामी अभ्यासिकेला सनदी अधिकारी मनीषा पाटणकर यांनी भेट दिली व मनपाच्या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले.**

४ ## ३९ लाख ४५ हजार

रुपये खर्च करून ही अभ्यासिका बांधण्यात आली आहे. होतकरू विद्यार्थ्यांना युपीएससी, एमपीएससी तसेच अन्य स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी ही अभ्यासिका फार उपयोगी ठरत आहे.







## महापौर चषक कबड्डी सामने




क्रीडा क्षेत्रातील तरुण-तरुणींना त्यांच्या कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी आणि प्रोत्साहित करण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेने 'महापौर चषक २०१६' चे आयोजन केले. जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या माध्यमातून ५, ६, ७ फेब्रुवारी २०१६ रोजी श्री विठ्ठल व्यायाम शाळा क्रीडांगण, विठ्ठल मंदिर वॉर्ड येथे विदर्भस्तरीय महिला व पुरुष कबड्डी सामने घेण्यात आले. बक्षिस वितरण कार्यक्रमाला तत्कालीन केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराजभैया अहिर, महापौर राखी संजय कंचर्लावार, उपमहापौर वसंता देशमुख यांची उपस्थिती होती.

## कला-गुणांना वाव



शालेय विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देण्यासाठी महानगरपालिका, चंद्रपूरच्या वतीने उच्च प्राथ शाळासाठी सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रम घेण्यात आले. ४ मार्च २०१५ रोजी शालेय विद्यार्थ्यांना चषक देऊन प्रोत्साहित करताना महापौर राखी संजय कंचर्लावार, उपमहापौर वसंत देशमुख.



# महापौर चषक कुस्ती स्पर्धा



चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित जिल्हा कुस्तीगर संघ व जगतगुरू व्यायामशाळेच्या सहकार्याने महापौर चषक कुस्ती स्पर्धा स्थानिक गांधी चौक येथे झाली. महापौर चषक किताबाकरिता ऑलिम्पिक कॅम्पसाठी निवड झालेली महाराष्ट्रातील एकमेव महिला खेळाडू स्वाती शिंदे कोल्हापूर तर महाराष्ट्र पदक विजेती नंदिनी साळुंके कोल्हापूर यांच्यात लढत होऊन स्वाती शिंदे ही विजेती ठरली. तिला मान्यवरांच्या हस्ते मानाचा पट्टा, स्मृतीचिन्ह व रोख २१ हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला, तर उपविजेती नंदिनी साळुंके हिला स्मृतीचिन्ह व रोख रक्कम ११ हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला. तसेच महापौर चषक पुरुष किताबाकरिता अहमदनगरचा युवराज भोसले व नाशिकचा गौरव गणोरे यांच्यात लढत झाली. अहमदनगरचा युवराज भोसले हा विजेता ठरला. त्याला मान्यवरांच्या हस्ते मानाची गदा, मानाचा पट्टा, स्मृतीचिन्ह व रोख रक्कम ५१ हजार रुपये पुरस्कार देण्यात आला तर उपविजेता गौरव गणोरे नाशिक याला स्मृतीचिन्ह व रोख रक्कम २५ हजार रुपये पुरस्कार देण्यात आला. या उपक्रमाची महाराष्ट्रभर ख्याती झाली.











# महापौर चषक
# संगीत रजनी

चंद्रपूर शहरात सांस्कृतिक वातावरण तयार व्हावे, या हेतूने महापौर चषकाअंतर्गत विविध आर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले होते. २४ जानेवारी २०१६ रोजी संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. यात गायिका वैशाली सामंत, अभिनेता मिलिंद गुणाजी, नृत्यांगणा भाग्यश्री चिरमुले यांनी सहभाग घेतला होता.



नृत्यांगणा आणि अभिनेत्री भाग्यश्री चिरमुले हिला स्मृतिचिन्ह देताना महापौर राखी संजय कंचर्लावार.

## घाणीचे उकिरडे बनले पर्यटनाचे ठिकाण



# रामाळा तलाव रोड सौंदर्यीकरण





१ रामशहा या गोंडराजाने रामाळा तलाव बांधला होता. या शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी या तलावाचा उपयोग होत असे. तलावाच्या काठावरील मार्ग नादुरुस्त होता. शिवाय मोठी अस्वच्छता होती. त्यामुळे महिला, तरुण, तरुणी येथे फिरायला येऊ शकत नव्हत्या.

2 महापौर राखी कंचलावार यांच्या संकल्पनेतून जटपूरा गेट ते पाच देऊळ चौकापर्यंत रस्त्याचे काम करण्यात आले. शिवाय मनपातर्फे रामाळा तलावाचे सौंदर्यीकरण करून रस्ता, स्ट्रीट लाईट, तलावाला स्टीलचे ग्रील व सिंगापूर पॅटर्नचा स्टॅच्यू उभाण्यात आला.

3 २२ फेब्रुवारी २०१७ रोजी त्याचे लोकार्पण झाले. तलावातील इकॉर्निया काढण्याचे काम मनपातर्फे करण्यात येते. रामाळा तलाव प्रदूषणमुक्त करण्याकरिता चंद्रपूर शहर महानगरपालिका प्रयत्नशील आहे. त्यामुळे एकेकाळी घाणीचे उकिरडे असलेले हे स्थळ आज पर्यटनाचे ठिकाण बनले आहे.



## गरजू महिलांना शिलाई यंत्राचे वाटप




महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी आणि आर्थिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महापौर राखी कंचर्लावार यांच्या संकल्पनेतून २६ एप्रिल २०१६ रोजी शिवणयंत्र वाटप करण्यात आले.

## रुग्णवाहिकेचे लोकार्पण




रुग्णसेवेच्या दृष्टीने रुग्णवाहिकेचे फार महत्व आहे. रुग्णवाहिकेअभावी रुग्णाचा जीव जाऊ नये, यासाठी महापौर राखी कंचर्लावार यांच्या संकल्पनेतून २२ सप्टेंबर २०१५ रोजी रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले.

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे



'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' हे ब्रीद घेऊन पुढे जाऊ, तरच भूतलावरील मनुष्यांचे जीवन समृद्ध होईल, अशी संकल्पना महापौर राखी कंचर्लावार यांनी मांडली. २० जून २०१६ रोजी महानगरपालिकेच्या वतीने स्थानिक गांधी चौकात वृक्ष लागवड व संवर्धन हा जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. तसेच शालेय विद्यार्थांची वृक्षदिंडी काढण्यात आली.



चंद्रपूर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या मौलाना अब्दुल कलाम आझाद बगीचा नागरिकांचा आत्मा आहे. त्याचे सौंदर्यीकरण व्हावे, यासाठी महापौर राखी कंचर्लावार यांनी पुढाकार घेतला. या बगीचाच्या विकासकामाचे ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते २७ एप्रिल २०१६ रोजी भूमिपूजन करण्यात आले. महापौर राखी कंचर्लावार यांनी ज्येष्ठ नागरिक डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार, गणपतराव अमृतकर, विठ्ठलराव घटे, विजय चंदावार, शफीक अहमद, डॉ. गोपाल मुंधडा, राजेंद्र खजांची, आशा ठाकरे, शोभा कच्छवा, मृणालिनी खोब्रागडे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.



# प्रवासी निवारा




शहरातील नागरिक शहरबस सेवेच्या माध्यमातून प्रवास करीत असतात. महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसमोर प्रवाश्यांना रस्त्यावर उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत होती. ही गैरसोय दूर करण्यासाठी ५ सप्टेंबर २०१६ रोजी गांधी चौक येथे प्रवासी निवारा सुरु करण्यात आला. यावेळी महापौर राखी संजय कंचर्लावार, उपमहापौर वसंता देशमुख यांची उपस्थिती होती.



# आरोग्य शिबीर

सर्वसामान्य जनता निरोगी राहावी, यासाठी महापौर राखी संजय कंचर्लावार यांच्या संकल्पनेतून ४ फेब्रुवारी २०१६ रोजी चंद्रपूर शहर महानगर पालिकेच्या आरोग्य विभागअंतर्गत इंडियन मेडिकल असोशिएशन चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबीर घेण्यात आले. या शिबिराला सामान्य नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला होता. सर्वांची मोफत तपासणी करून औषधोपचार करण्यात आले.

# वसुंधरेचे ऋण फेडण्यासाठी वृक्षलागवड




चंद्रपूर शहर उन्हाळ्याच्या दिवसात सर्वात उष्ण असते. पिण्याच्या पाण्याचे साठे आटू लागतात. शिवाय उद्योगामुळे प्रदूषण समस्या आहे. वृक्षलागवडीतून पर्यावरण पूरक काम करून वसुंधरेचे ऋण फेडण्यासाठी वित्त व वनमंत्री  ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात जुलै २०१६ रोजी वनविकास मंडळाचे अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, आमदार नाना शामकुळे यांच्या मार्गदर्शनात महापौर राखी कंचर्लावार यांनी वृक्षलागवड मोहीम हाती घेतली होती. वनक्षेत्र घटल्यास वातावरणावर परिणाम होऊन दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ शकते, हे चित्र बदलण्यासाठी वनविभागाच्या मदतीने १ जुलै रोजी राज्यात २ कोटी वृक्ष लावण्यात आले. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते प्रचार व प्रसारण साहित्याचे प्रकाशन करण्यात आले. वृक्षलागवड मोहिमेच्या प्रसिध्दी वाहनाला हिरवी झेंडी दाखवून प्रसिध्दी मोहिमेला सुरुवात करण्यात आली. चंद्रपूर शहरात नागरिक, स्वयंसेवी संस्था, मंडळे, व्यापारी, व्यावसायिक संस्थांनी आपले स्वयंस्फुर्त योगदान दिले.



## मनपाच्या आमसभेत राष्ट्रगीत

कवी रवींद्रनाथ टागोर यांनी लिहलेले जन गण मन हे भारताचे राष्ट्रगीत आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या मासिक आमसभेच्या प्रारंभी राष्ट्रगीत गायनाची प्रथा महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी सुरु केली. ती आजही नित्यनेमाने सुरु आहे. राष्ट्रगीत हे देशाचा इतिहास, परंपरा, स्वातंत्र्यासाठी झुंजलेल्या संघर्षाचे स्फूर्तिदायक गीत आहे. सभागृहात राष्ट्रभक्ती, जनसेवा आणि त्यागाची भावना निर्माण व्हावी यासाठी राष्ट्रगीत गायनाची प्रथा सुरु करण्यात आली.



# शिवराज्यभिषेक सोहळ्याची प्रतिकृती





चंद्रपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुशोभीकरण करून, सौंदर्यीकरण करण्यासाठी ३० ऑक्टोबर २०१५ रोजी महापौर राखी कंचर्लावार यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. त्यानंतर येथे शिवराज्यभिषेक सोहळ्याची प्रतिकृती साकारण्यात आली. त्याचा लोकार्पण सोहळा पुढे ऑगस्ट २०१७ मध्ये लोकनेते सुधीरभाऊ मुनगंटीवार आणि तत्कालीन गृहराज्यमंत्री हंसराजभैया अहिर यांच्या उपस्थितीत पार पडला.



# महाकाली यात्रेतील भाविकांसाठी सुविधा

चंद्रपूरची आराध्य दैवत माता महाकालीची यात्रा दरवर्षी होत असते. आंध्रप्रदेश, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील भाविकवर्ग मोठ्या प्रमाणात चंद्रपुरात दाखल होतात. आरोग्य, स्वच्छता, वैद्यकीय सेवा आणि पाणीपुरवठ्यासह निवासाची व्यवस्था केली जाते. दुकानदारांना जागावाटप, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने यात्रा परिसरात यात्रा कार्यालयाची स्थापना करण्यात आली. या कार्यालयाचे उद्घाटन महापौर राखी यांच्या हस्ते झाले. येणाऱ्या भाविकांना आंघोळीकरिता झरपट नदीचे पात्र स्वच्छ करण्यात आले. अंचलेश्वर बंधाऱ्याजवळ शॉवरची व पिण्याचे पाण्याकरिता नळाची व्यवस्था करण्यात आली. बैलबाजार भागात आंघोळीकरिता व्यवस्था केली. भाविकांना शौचालयाकरिता अंचलेश्वर गेट, महाकाली पटांगण येथील सुलभ शौचालय तर महानगरपालिकेचे फिरते शौचालय व बैलबाजार भागात कच्चे शौचालय उभारण्यात आले. अंचलेश्वर गेट ते बागला चौकपर्यंत रस्ता दिभाजकाला रंगरंगोटी करुन परिसर सुशोभित करण्यात आला. महाकाली यात्रा कार्यालयात यात्रा पोलिस चौकी व दवाखाना स्थापन करण्यात आला. या दवाखाण्यात रुग्णांना मोफत तपासणी करुन मोफत औषधोपचार देण्यात आले. यात्रा परिसरात अम्बुलस व्यवस्था करण्यात आली.

















# ‘निकृष्ट विकासकामांची तक्रार करा’






केंद्रात व राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन झाल्यानंतर विकास कामांना वेग आला. चंद्रपूर महानगरपालिकेलाही भरघोस निधी प्राप्त झाला. पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीयमंत्री हंसराज अहीर, आमदार नानाभाऊ शामकुळे यांनी महानगर पालिकेच्या विकासासाठी भरीव तरतूद करीत मनपाला निधी उपलब्ध करून दिला. तेव्हापासून शहरातील विविध विकासकामे हाती घेण्यात आली. ही कामे होत असताना प्रशासकीय अधिकारी व कंत्राटदार यांच्याकडून कामाचा दर्जा निकृष्ट आढळल्यास थेट तक्रारी करण्यासाठी महापौर राखी कंचर्लावार यांनी उपक्रम राबविले. ‘निकृष्ट विकासकामांची तक्रार करा’, असे आवाहन करून वचक निर्माण केला. यामुळे शहरात पारदर्शी कामे झाली.



## उल्लेखनीय कार्य



शालेय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आणि उज्ज्वल भविष्याला प्रोत्साहित करण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीतील वर्ग दहावी व बारावीच्या परीक्षेत प्रावीण्य प्राप्त करणा-या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार १६ जुलै २०१६ रोजी महानगरपालिका सभागृह करण्यात आला.



आराध्य दैवत कन्यका मातेच्या नावाने एका चौकाला “जय वासवी माता चौक" हे नाव देऊन त्याचा एक सुशोभित स्तंभ उभा करुन त्या चौकाचे सौंदर्यीकरण करण्यात आले.



दुष्काळाच्या दिवसात पाण्याची असुविधा होऊ नये, यासाठी पाण्यासाठी ४ नवीन ट्रॅक्टर घेण्यात आले.



आर्थिकदृष्ट्या कमकुवत नागरिकांकडे अंत्यविधीसाठी वेळीअवेळी पैसे राहत नाही. अंत्यविधीसाठी लागणारी आवश्यक रक्कम नसल्याने गैरसोय होऊ नये यासाठी गरीब नागरिकांना दोन हजार रुपये अंत्यविधी सानुग्रह अनुदान देण्याची योजना सुरु केली.



चंद्रपूर शहरात आगमन झाल्यावर रस्त्याची दिशा दाखविण्यासाठी मोठे दिशा मार्गदर्शक फलक (Sing Bord) लावण्यात आलेत.



गरीब जनतेला आरोग्य सेवा त्वरित मिळावी, यासाठी २ रुग्णवाहिका सतत २४ तास सेवेत रुजू केल्या.  शववाहिकाची सुरुवात करुन ३ शीतशवपेटीची सुविधा प्राप्त करुन दिली.

# पथदिवे




चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरात विविध ठिकाणी हायमास्ट पथदिवे लावण्यात आले. उदघाटनप्रसंगी महापौर राखी कंचर्लावार यांच्यासह नगरसेवक.





चंद्रपूर शहरातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत झोपडपट्टी व बेघरांना घर उपलब्ध करुन देण्याची योजना राबविण्यात आली. २०२२ पर्यंत प्रत्येकाला घर हा संकल्प पूर्ण करण्यासाठी महानगरात २१,७०० लोकांनी अर्ज सादर केले. त्यातील १९४०८ अर्जाची तपासणी करण्यात आली. पहिल्या टप्प्यात विकास नगर, दत्तनगर आणि मित्र नगर वस्तीतील प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. यात झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास आर्थिक दुर्बल आणि अल्पउत्पन्न घटकांसाठी घराची निर्मिती, खासगी भागीदारीव्दारा घरांची निर्मिती आणि आर्थिक दुर्बल घटकांसाठी लाभार्थ्यांना वैयक्तिक घरकुल बांधण्यासाठी अनुदान अशा ४ प्रकारच्या योजना राबविण्यात आल्या. ९८९६ अर्जधारकांना नजिकच्या काळात लाभ प्राप्त होणार आहे.



नगरोत्थान व पायाभूत सुविधा, रस्त्यांवर पथदिवे उभारून शहराला प्रकाशमय करण्यासाठी मोलाचा वाटा उचलला.



मनपाच्या शाळांना डिजीटल करणे, आरोग्य केंद्राचे नुतनीकरण, दलित वस्ती सुधारणा,



आवास योजना व पंतप्रधान आवास योजनेसाठी त्यांनी महत्वपूर्ण कार्य केले



चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूरचे कार्यक्षेत्रात प्रभागनिहाय सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम करण्यासाठी प्रभाग १ ते ३३ मध्ये १६९ कोटी रूपयांची कामे करण्यात आली.








महापौरपदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन व शुभेच्छा देताना नगरसेवक संजय नारायण कंचर्लावार.




: प्रकाशक :

प्रज्वलंत प्रमोद कडू । सूरज बंडूजी पेद्दूलवार

